# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 10/11/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### घरफोडी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील पंचवटी काटोल येथे दिनांक 05/11/2021 ते 09/11/2021 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कार्तिक दिलीप सावरकर वय 21 वर्ष रा. पंचवटी काटोल यांचे घराचे दाराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील चांदीचे दोन चम्मच किं 10,000/–रू., स्मार्ट वॉच कि. 2,000/–रू. व आलमारीत ठेवलेले नगदी 7,000/–रू. असा एकुण कि. 19,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून भेन्डे मो.क. 9923193642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील मौजा वाठोणा येथे दिनांक 08/11/2021 चे 21.00 वा. ते 05.30 वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– पांडुरंग कृष्णराज बनाईत वय 60 वर्ष, रा. वाठोणा ता. नरखेड जि. नागपूर यांचे दुकानाचे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकातील नगदी 11,000/–रु. व किराणा दुकानातील लाकडी पेटीतील 1,810/–रु. किराणा सामान व तसेच शेजारील दुकानाचे लोखंडी शेटर तोडुन दुकानातील केक भरणी कि. 180/–रु. ची व दुकानामध्ये स्टीलच्या डब्यामध्ये ठेवलेले नगदी 30,000/–रु. असा एकुण कि. 42,990/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलिस हवालदार धोंडे मो.क 8788365210 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर